# अंतिम वर्षाच्या परीक्षा घेऊ नका

## उच्च व तंत्र शिक्षण मंत्री उदय सामंत यांचे युजीसीला पत्र : ग्रेड देऊन पास करण्याची मागणी

प्रतिनिधी
मुंबई

राज्यातील विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि त्यांची सुरक्षा आम्हाला महत्त्वाची आहे. ही बाब लक्षात घेऊन आम्ही राज्यात पदवी, पदव्युत्तर आदी अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाची कोणतीही परीक्षा घेणार नाही. त्यामुळे आम्ही विद्यापीठ अनुदान आयोगाला पत्र लिहून अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांना ग्रेड देऊन पास करण्याची मागणी करणार असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली. मंगळवारी सामंत यांनी फेसबुकच्या माध्यमातून



राज्यातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला.

सामंत म्हणाले, युजीसीकडे मी पत्र लिहून तशा प्रकारची मागणी केली आहे. मात्र त्यानंतरही काही निर्णय झाला नाही तर आम्हाला राज्य सरकार म्हणून एक वेगळी ठोस भूमिका घ्यावी लागेल. त्याला मंत्रिमंडळाचीही मंजुरी मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

सरकार राज्यातील विद्यार्थ्यांच्या आरोग्याच्या आणि त्यांच्या सुरक्षेचा विचार करत आहे. त्यामुळेच आम्ही राज्यात अंतिम वर्षाच्या परीक्षा घेणार नाही. युजीसीकडून आम्हाला काय निर्णय येतोय ते पहायचे आहे. युजीसीकडून अपेक्षित निर्णय न आल्यास उच्चस्तरीय अधिकारी मिळून बैठक घेऊ व त्यानंतर काही कुलगुरूंशी चर्चा करून अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांना ग्रेडिंग पद्धतीने काही गुण देता येतील का, यावर दोन दिवसात निर्णय घेऊ, असे सामंत यांनी स्पष्ट केले.

राज्यात सीईटीच्या ज्या परीक्षा आम्हाला घ्यायच्या होत्या त्या घेणे आवश्यक आहेत. त्याचे वेळापत्रक जाहीर केले आहे. त्यावर पुढे आम्ही वेगळे निर्णय घेऊ शकतो. सध्या वैद्यकीय प्रवेशाच्या संदर्भात काही सामायिक प्रवेश परीक्षेची प्रक्रिया सुरू असून त्यामध्ये आम्ही विद्यार्थ्यांना मोठा दिलासा देणार आहोत. यापूर्वीच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरावर आपल्या परीक्षा केंद्रासाठीची नोंदणी केली असेल त्यांना तालुकास्तरावर परीक्षा घेण्यासाठीची सोय आम्ही उपलब्ध करून देणार आहोत. या परीक्षेमध्ये सोशल डिस्टन्सचे नियम पाळणे बंधनकारक असणार आहे.



### आयडॉलच्या विद्यार्थ्यांना द्यावी लागणार परीक्षा

मुंबई विद्यापीठाच्या दूर व मुक्त अध्ययन संस्थांमध्ये (आयडॉल) वार्षिक परीक्षा पध्दत अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागणार असल्याची घोषणा आयडॉलच्यावतीने मंगळवारी केली आहे. पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या पहिल्या वर्षात असणाऱ्या विद्यार्थ्यांना पुढील वर्षात प्रवेश देण्यात येणार आहे. मात्र शैक्षणिक वर्ष सुरू झाल्यानंतर चार महिन्यात या विद्यार्थ्यांची परीक्षा होणार आहे.

तरुण भारत Wed, 20 May 2020
https://epaper.tarunbharat.com/c/52059889

# महाविद्यालयांच्या अंतिम परीक्षा टाळा



**मुंबई :** कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज्यातल्या महाविद्यालयांतील अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा न घेता ग्रेडिंग देऊन विद्यार्थ्यांना पदवी देण्यात यावी, असे पत्र शासनाकडून विद्यापीठ अनुदान आयोगास (यूजीसी) देण्यात आले असल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी दिली.

उदय सामंत यांनी फेसबुक लाईव्हच्या माध्यमातून राज्यातील विद्यार्थ्यांशी संवाद साधला. राज्यातील स्थिती पाहता अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षासुद्धा रद्द करून विद्यार्थ्यांना ग्रेडिंग देऊन पदवी देण्याची परवानगी देण्यात यावी, अशी विनंती विद्यापीठ अनुदान आयोगाला करण्यात आली आहे. या पत्राचे उत्तर आल्यानंतर येत्या दोन दिवसांत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याशी चर्चा करून तसेच पर्यावरण मंत्री आदित्य ठाकरे, मुख्य सचिव अजोय मेहता, उच्च व तंत्रशिक्षण विभागाचे सचिव सौरभ विजय, परीक्षेसंदर्भात नियुक्त केलेल्या समितीचे सदस्य, विद्यापीठाचे कुलगुरू यांच्यासोबत बैठक घेऊन अंतिम निर्णय जाहीर करण्यात येईल, असे ते म्हणाले.बारावी सीईटीच्या परीक्षा घेण्यात येणार असून त्याचे वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाणार आहे. त्याबाबत परिस्थिती पाहून निर्णय घेण्यात येईल.

पुढारी

# पदवीच्या अंतिम सत्राच्या परीक्षा रद्द करा : ना. सामंत

**मुंबई : पुढारी वृत्तसेवा**

राज्यातील कोरोनाचा वाढत्या प्रादुर्भावामुळे राज्यातील विद्यापीठांना पदवीच्या अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्रातील परीक्षा घेणे कठीण बनणार आहे. विद्यार्थी संख्या पाहता सामाजिक अंतरविषयक निकषांचे पालन करून ८ ते १० लाख विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचे अडचणीचे ठरणार आहे. विद्यार्थ्यांचे शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्य याचा विचार करून अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा न घेता आयोगाच्या सूचनांनुसार ग्रेड प्रदान करणे या पर्यायाला मान्यता द्यावी, अशी मागणी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे केली आहे. यासंदर्भात आता राज्य स्तरावरही दोन दिवसांत बैठक होणार आहे. यासंदर्भातील माहिती सामंत यांनी फेसबुक लाईव्हद्वारे राज्यातील विद्यार्थ्यांना मंगळवारी दिली.

Kolhapur Edition
20 May, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# ‘दूरशिक्षण’ लेक्चर्सचे ९०० व्हिडिओ

## विद्यार्थी गिरवतात धडे; २२ हजारांवर व्ह्यूज, परीक्षा रद्द झाल्या तरी व्हिडिओ मार्गदर्शक

**संदीप खांडेकर :**
सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १९ : शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागाने विविध अभ्याक्रमांवर आधारित लेक्चर्सचे ९०० व्हिडिओ तयार केले असून, सुमारे २२ हजारांहून अधिक व्ह्यूज त्याला मिळाल्या आहेत. ३७ दिवसांत ५५० व्हिडिओ बनविल्यानंतर विभागाने आणखी ३५० व्हिडिओंची त्यात भर टाकली आहे. केवळ बहिस्थ:च नव्हे, तर नियमित विद्यार्थीही त्याद्वारे अभ्यासक्रमातील धडे गिरवत आहेत.



यंदा कोरोनामुळे केवळ अंतिम वर्षाच्या परीक्षा होणार आहेत. तसे उच्च व तंत्रशिक्षण मंत्र्यांनी जाहीर केले. विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांची मात्र अभ्यासापासून सुटका नाही. विभागाने मात्र तत्परतेने याआधीच व्हिडिओ बनविण्याच्या कामास सुरवात केली.

> **ई कंटेट डेव्हलपमेंटची सुरवात दूरशिक्षणने केली आहे. त्याचा ग्रामीण विद्यार्थ्याला फायदा होतो. दूरशिक्षणमधील प्राध्यापकांकडून चांगले काम झाले आहे. भविष्यात पालक वर्गालाही ऑनलाईन लेक्चर्सचे व्हिडिओ पाहून विद्यार्थ्याला तंत्रज्ञानाचा वापर करण्यासाठी प्रोत्साहित करता येईल.**
> - **डॉ. डी. टी. शिर्के,** प्र-कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

बीए, बीकॉम, एमबीए व एमएच्या अभ्यासक्रमांचे साडेपाचशे लेक्चर्सचे व्हिडिओ www.unishivaji.ac.in/distedu विद्यापीठाच्या संकेतस्थळावर अपलोड केले. त्यानंतरही विभागातील प्राध्यापक थांबले नाहीत. त्याहीपुढे जाऊन व्हिडिओ तयार करण्याचे काम सुरूच ठेवले आहे. विभागाकडे सध्या २५ हजार विद्यार्थी शिक्षण घेतात. त्यांना व्हिडिओचा फायदा झालाच, शिवाय त्याची माहिती नियमित विद्यार्थ्यांपर्यंतही पोचली. त्यांनी व्हिडिओतून अभ्यासक्रमातील धडे समजून घेतले आहेत.

उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांनी यूजीसीला अंतिम वर्षाच्या परीक्षा घेताना महाराष्ट्रातील कोरोनाच्या गंभीर परिस्थितीची जाणीव करून देणारे पत्र पाठवले आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करता अंतिम वर्षांच्या परीक्षेबाबतही मार्गदर्शन मागवले आहे. त्यामुळे अंतिम वर्षाच्या परीक्षा रद्द झाल्या, तरी लेक्चर्सचे व्हिडिओ विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शक ठरणार आहेत. उपकुलसचिव डॉ. नीलेश बनसोडे म्हणाले, ‘‘साडेपाचशेचा टप्पा पूर्ण झाल्यावर विभागातील प्राध्यापक थांबले नाहीत. त्यांनी लेक्चर्सचे व्हिडिओ तयार करणे सुरूच ठेवले आहे.’’

पुढारी

# विद्यापीठ परीक्षांबाबत विद्या परिषद बैठकीनंतर अंतिम निर्णय

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या परीक्षांबाबत २७ मे रोजी होणाऱ्या विद्या परिषदेच्या बैठकीत चर्चा होणार आहे. त्यानंतरच अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे. विद्यापीठातर्फे विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षा घेण्याबाबत नियोजन सुरू झाले आहे. नुकतीच विद्यापीठ नियुक्त समितीची कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत ऑनलाईन बैठक झाली. यात अंतिम सत्राच्या परीक्षा, तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा नियोजनाबाबत चर्चा झाली.

My Kolhapur Edition
20 May, 2020 Page No. 1
Powered by : erelego.com

# ‘टीवाय’साठीही ग्रेडेशन

**म. टा. प्रतिनिधी, पुणे**

‘करोनाच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे राजातील अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेणे अव्यवहार्य आहे. या विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याचा विचार करता या विद्यार्थ्यांची परीक्षा न घेता त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (यूजीसी) मार्गदर्शन तत्त्वांनुसार श्रेणी देण्याची परवानगी द्यावी; तसेच याबाबत मार्गदर्शन सूचना द्यावी,’ अशी मागणी पत्राद्वारे यूजीसीच्या अध्यक्षांना केल्याची माहिती उच्च व तंत्रशिक्षण मंत्री उदय सामंत यांनी मंगळवारी दिली.

यूजीसीचे उत्तर दोन दिवसांत मिळाले नाही, तर राज्य सरकार मार्गदर्शक तत्त्वांनुसार निर्णय जाहीर करणार असल्याचे सामंत यांनी फेसबुक लाइव्हद्वारे स्पष्ट केले.

करोनामुळे उद्भवलेल्या परिस्थितीत विद्यापीठांच्या परीक्षा घेण्याबाबत यूजीसी आणि राज्य सरकारच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने मार्गदर्शक तत्त्वे जाहीर केली आहेत. त्यानुसार राज्यातील अकृषी



## उदय सामंत यांची यूजीसीकडे मागणी

विद्यापीठांच्या अभ्यासक्रमांच्या केवळ अंतिम वर्षात शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची परीक्षा जुलै महिन्यात होणार आहे. तर, अंतर्गत मूल्यमापन व यापूर्वीच्या परीक्षांच्या आधारे इतर वर्षाच्या विद्यार्थ्यांना पुढच्या वर्गात प्रवेश दिला जाणार आहे. राज्यातील सुमारे ८ ते १० लाख विद्यार्थ्यांची परीक्षा जुलै महिन्यात होणार आहे. मात्र, साधारण अडीच महिन्यांपासून विद्यार्थी गावाकडे आहेत. त्यांना अचानक वसतिगृहे सोडावे लागल्याने शैक्षणिक साहित्य तेथेच राहिले आहे. ग्रामीण भागात इंटरनेटची समस्या असल्याने विद्यार्थ्यांचा ऑनलाइन अभ्यास होऊ शकत नाही. त्यातच करोनाच्या भीतीमुळे अनेक विद्यार्थी परीक्षा द्यायला तयार नाहीत.

या परीक्षेसाठी विदर्भ, मराठवाडा, कोकण, खान्देशातून विद्यार्थ्यांना पुन्हा पुणे आणि मुंबई या रेड झोनमध्ये यावे लागेल, त्यांच्या आरोग्याची, जेवणाची व्यवस्था कशी करणार, असे अनेक प्रश्न विद्यार्थ्यांनी उपस्थित केले होते.

### शिवाजी विद्यापीठाचे ७५ हजार विद्यार्थी

शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कॉलेजमध्ये तृतीय वर्षाची परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या ७५ हजार इतकी आहे. यूजीसीच्या निर्णयानंतर विद्यापीठ परीक्षेबाबत निर्णय घेणार आहे. दरम्यान, विद्यापीठाच्या अकॅडमिक कौन्सिलची बैठक २७ मे रोजी होणार आहे. या बैठकीत पुढील नियोजन करण्यात येईल.



# परीक्षेबाबत आराखडा करा

कोल्हापूर टाइम्स टीम

शिवाजी विद्यापीठाच्या दूरशिक्षण विभागास परीक्षा घेण्यासंदर्भात आराखडा सादर करण्याच्या सूचना विद्यापीठ शैक्षणिक सत्र आणि वेळापत्रक निश्चितीसाठी नियुक्त समितीच्या बैठकीत देण्यात आल्या.

विद्यापीठातर्फे विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम वर्षाच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षांचे वेळापत्रक व अडचणीबाबत सोमवारी विद्यापीठ नियुक्त समितीची कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरु डॉ. डी.टी.शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ऑनलाइन बैठक झाली. अंतिम सत्राच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षा कशा घ्यायच्या, तोंडी व प्रात्यक्षिक परीक्षा यांचे नियोजन कसे करायचे यावर सदस्यांनी मते मांडली. महाविद्यालयांना येणाऱ्या अडचणी व डॉ. आर.के.कामत यांनी तयार केलेल्या सॅनिटायझर प्रोटोकॉलबाबत चर्चा झाली.

शिवाजी विद्यापीठाच्या पदवी आणि पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा १ ते ३१ जुलै या कालावधीत घ्याव्यात अशा सूचना यूजीसीने गेल्या आठवड्यात

## परीक्षा समितीच्या बैठकीत सूचना

दिल्या आहेत. त्यानुसार राज्यातील समितीनेही अहवाल दिला होता. याबाबत राज्यातील विद्यापीठांनी आपापल्या पातळीवर परीक्षेचे नियोजन करावे, अशा सूचना राज्य सरकारने दिल्या आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारच्या मार्गदर्शक नियमावलीनुसार परीक्षेचे नियोजन प्रशासनाने केले आहे. विद्यापीठाच्या वेबसाइटवर परीक्षेसंबंधी माहिती उपलब्ध केली आहे. विद्यापीठाच्या स्तरावर सध्या परीक्षेचे वेळापत्रक तयार करण्याचे काम सुरू आहे. आराखड्यामध्ये परीक्षांची वेळ निश्चित करणे, परीक्षागृहातील विद्यार्थ्यांची संख्या मर्यादीत ठेवणे, सुरक्षित वावर नियमाचे पालन करणे, परीक्षेला येण्यापूर्वी परीक्षा झाल्यानंतर विद्यार्थ्यांना सुरक्षित बाहेर जाण्याची व्यवस्था करणे याचाही समावेश आहे.

या बैठकीत परीक्षेच्या रचनेबाबतही चर्चा करण्यात आली. बीए, बीकॉम, बीएसस्सी सेमिस्टर सहा आणि एमए, एमकॉम, एमएस्सी सेमिस्टर चारच्या अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा समावेश आहे. तसेच आर्किटेक्चर आणि लॉ अभ्यासक्रमाच्या दहाव्या सेमिस्टरची परीक्षा होणार आहे. बीई, बीटेक्च्या सेमिस्टर आठची परीक्षा होईल. दरम्यान, जी मुले अंतिम सत्राची परीक्षा देणार आहेत, त्यांचे मागील सत्रातील विषयात अनुत्तीर्ण असतील तर त्यांची परीक्षा कॉलेज स्तरावर होईल. वार्षिक परीक्षा पद्धती असणाऱ्या पदव्युत्तर पदविका व पदविका अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांनी अंतिम परीक्षा देणे आवश्यक आहे.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे, समिति अध्यक्ष डॉ. धनाजी कणसे यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते.



लोकमत

# अंतिम वर्षाच्या परीक्षा होणे अवघडच : सामंत

लोकमत न्यूज नेटवर्क

मुंबई : अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा न घेता ग्रेडिंग देऊन पदवी देण्यात यावी, असे पत्र राज्य शासनाकडून विद्यापीठ अनुदान आयोगास देण्यात आल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी दिली. मात्र, सीईटीच्या परीक्षा होणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या फेसबुक लाइव्हच्या माध्यमातून सामंत यांनी मंगळवारी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. बारावीनंतरच्या सीईटीच्या परीक्षा मात्र होणार असून त्यांच्या तारखा त्यांनी जाहीर केल्या असल्या तरी त्याबाबतही परिस्थिती पाहून निर्णय घेण्यात येईल, असे त्यांनी म्हटले. पदवीसाठी असणारी सीईटी परीक्षा जुलैमध्ये घेण्यात येणार आहे. जिल्हा स्तरावर होणारी परीक्षा ही तालुक्याच्या ठिकाणी घेतली जाईल. तसेच जे विद्यार्थी आपल्या मूळ रहिवासाच्या ठिकाणी गेले आहेत किंवा ज्यांना निवडलेल्या परीक्षा केंद्रावर उपस्थित राहणे शक्य होणार नसेल याचा विचार करून त्यांना निवडलेले परीक्षा केंद्र बदलण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. टाळेबंदीमुळे ज्या विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रापर्यंत जाणे शक्य होणार नाही, त्यांची व्यवस्था विभागाकडून करण्यात येईल, अशी माहितीही सामंत यांनी दिली.

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत वैद्यकीय शिक्षण विभागाच्या पदव्युत्तर वैद्यकीय व पदव्युत्तर दंत अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे, असेही मंत्री सामंत यांनी सांगितले.

लोकमत

# विद्यापीठातील अंतिम सत्राच्या परीक्षा रद्द होण्याची शक्यता

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : प्रथम, द्वितीय वर्षापाठोपाठ आता शिवाजी विद्यापीठातील अंतिम सत्राच्या परीक्षा रद्द होण्याची शक्यता आहे; कारण, कोरोनाचा वाढता प्रादुर्भाव पाहता अंतिम सत्रातील विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात घालणे व्यवहार्य नसल्याचे सांगत उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी या विद्यार्थ्यांच्या परीक्षा न घेता ग्रेडिंग सिस्टीमसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे (यूजीसी) परवानगी मागितली आहे.

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठातील प्रथम, द्वितीय वर्षांचे एक लाख ४० हजार विद्यार्थी पुढील वर्गात विनापरीक्षा प्रवेशित होतील. अंतिम वर्षांच्या एकूण ७५ हजार विद्यार्थ्यांची परीक्षा होणार आहे. या परीक्षा दि. १ ते ३१ जुलैदरम्यान घेण्याची सूचना केली आहे. त्यावर विद्यापीठाने शैक्षणिक सत्र आणि परीक्षा वेळापत्रक निश्चितीसाठी १८ सदस्यीय समिती नियुक्त केली आहे. मात्र, कोरोनाचा प्रादुर्भाव वाढल्याने मंत्री सामंत यांनी अंतिम सत्राच्या परीक्षा रद्द करून या विद्यार्थ्यांना ग्रेडिंगवर पदवी बहाल करण्यात यावी, अशा मागणीचे पत्र यूजीसीला पाठविले आहे. त्यावर यूजीसीच्या सूचनेनुसार राज्यात कार्यवाही होण्याची शक्यता आहे.

> सध्या विद्यापीठाकडून अंतिम सत्राच्या परीक्षेचे स्वरुप आणि वेळापत्रक निश्चित करण्याची कार्यवाही सुरु आहे. शासनाच्या आदेशानुसार विद्यापीठाकडून कार्यवाही केली जाईल.
>
> \- डॉ. देवानंद शिंदे, कुलगुरु

# अंतिम सत्राच्या परीक्षा रद्द करा : उदय सामंत

सकाळ वृत्तसेवा

**मुंबई, ता. १९ :** कोरोना विषाणूच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे राज्यातील विद्यापीठांना पदवीच्या तृतिय वर्षाच्या शेवटच्या सत्रातील परीक्षा घेणे अवघड आहे. सोशल डिस्टन्सिंगचे नियम पाळून राज्यातील ८ ते १० लाख विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्याचे अडचणीचे ठरणार आहे. विद्यार्थ्यांच्या शारीरिक आणि मानसिक स्वास्थ्याचा विचार करून अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा न घेता आयोगाच्या सूचनांनुसार ग्रेड प्रदान करण्यात यावी, अशी मागणी उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी विद्यापीठ अनुदान आयोगाकडे केली आहे.

लॉकडाउनच्या पार्श्वभूमीवर विद्यापीठ अनुदान आयोगाने केलेल्या मार्गदर्शक सूचनेनुसार राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठांमधील परीक्षा आणि शैक्षणिक वेळापत्रकाच्या नियोजनाबाबत राज्य सरकारने राज्यस्तरीय समिती गठीत केली होती. विविध गटांशी चर्चा केल्यानंतर राज्यस्तरीय समितीने ६ मे २०२० रोजी सरकारला अहवाल दिला. या अहवालानुसार अकृषी विद्यापीठांमधील पदवीपूर्व आणि पदव्युत्तरच्या अंतिम वर्षातील विद्यार्थी वगळून इतर विद्यार्थ्यांना पुढील वर्षामध्ये प्रवेश देण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. पदवीच्या अंतिम वर्षाच्या अंतिम सत्राची परीक्षा मात्र होणार आहे. ८ ते १० लाख विद्यार्थ्यांच्या परीक्षा जुलै महिन्यात घेणे कठीण आहे.